पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०८

**सभावृत्तांत**

दिनांक - २८/११/२०१९ वेळ - दुपारी २.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २८/११/२०१९ रोजी दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.साधना अंकुश मळेकर
५. मा.कदम निकीता अर्जुन

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा सहा.आयुक्त (नावियो), मा.जागडे- उप नगरसचिव, मा.बहाद्दरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पवनाथडी जत्रेचे आयोजन करणेबाबत.- मा.सुजाता पालांडे , मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) मा.महिला व बालकल्याण समिती सभापती व सन्मा.सदस्य यांना त्रिवेंद्रम येथे दिनांक- २३ ते २४ डिसेंबर २०१९ रोजी होणा-या प्रशिक्षणास उपस्थित रहाणेकामी तसेच होणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.- मा.सुजाता पालांडे , मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव

दिनांक **१४/११/२०१९** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०७)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक - ०१
दिनांक – २८/११/२०१९
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.निकीता कदम
संदर्भ : मा.सुजाता पालांडे , मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविणेत येणा-या महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत दरवर्षी पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात येते.

तरी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी एच.ए.ग्राऊंड,पिंपरी / पी.डब्ल्यु.डी ग्राऊंड,सांगवी यापैकी एका ठिकाणी जानेवारी २०२० मध्ये पहिल्या अथवा दुस-या आठवडयामध्ये आयोजन करण्यास तसेच त्याकामी येणा-या खर्चास मान्यता तसेच सदर जत्रेच्या आयोजनाकामी केलेल्या उपलब्ध तरतुदीमधून तरतुद कमी पडल्यास आवश्यकतेनुसार (नागरवस्ती विभागांतर्गत योजना) महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत इतर योजना कार्यक्रमाच्या व तरतुदी मधून खर्च करण्यास व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदरचा ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक - ०२

दिनांक – २८/११/२०१९

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.निकीता कदम

संदर्भ : मा.सुजाता पालांडे , मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (All India Institute of Local Self - Government) यांचेकडील दिनांक ३०/१०/२०१९ रोजीच्या पत्रानुसार महानगरपालिकेतील सन्माननीय नगरसेवक,नगरसेविका व सभेचे कामकाज पाहणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी त्रिवेंद्रम येथे दिनांक- २३ व २४ डिसेंबर २०१९ रोजी प्रशिक्षण वर्ग आयोजित केलेले आहे. तरी सदर प्रशिक्षण वर्गास मा.महिला व बाल कल्याण समितीचे खालील सन्माननीय सदस्य व सभेचे कामकाज पाहणारे संबंधित कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | कुटे निर्मला संजय | – सभापती |
| २) | फुगे भिमाबाई पोपट | -- सदस्य |
| ३) | गोफणे अनुराधा देविदास | -- सदस्य |
| ४) | मुंढे उषा अंकुश | -- सदस्य |
| ५) | सुजाता सुनिल पालांडे | -- सदस्य |
| ६) | साधना अंकुश मळेकर | -- सदस्य |
| ७) | पवळे सुमनताई मधुकर | -- सदस्य |
| ८) | कदम निकीता अर्जुन | -- सदस्य |
| ९) | अश्विनी गजानन चिंचवडे – पाटील | -- सदस्य |
| १०) | श्रीम.चव्हाण शुभांगी | -- लिपिक (सभाशाखा तथा समन्वय अधिकारी) |

तरी दिनांक २३ ते २४ डिसेंबर २०१९ रोजी त्रिवेंदम येथे होणा प्रशिक्षण वर्गास वर नमूद मा.सदस्य व महानगरपालिकेतील सभेचे कामकाज पाहणारे कर्मचारी यांना उपस्थित राहणेकामी प्रत्येकी र.रु.१४,०००/- प्रमाणे येणा-या एकूण र.रु.१,४०,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख चाळीस हजार फक्त) खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदरचा ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५२२/२०१९
दिनांक : २८/११/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.